दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.९ डिसेंबर २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १०७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 9 December 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 107 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# दोन लाख रु.घेऊन दुपारी लग्न केले अन् तीन तासातच नवरी पळाली!

## नवरीसह बनावट लग्न लावून देणाऱ्या चौघा विरुद्ध गुन्हा दाखल

### पळून जाणारी नवरी पोलीसांच्या ताब्यात

#### घटनाक्रम

१ डिसेंबर – एजंट प्रल्हाद गुळभिले यांना लग्नासाठी मुलगी पाहण्या बाबत फोन
२ डिसेंबर १० हजार रु. खात्यावर पाठविले
४ डिसेंबर रोजी लॉजसाठी १९ हजार रु. खात्यावर पाठविले
५ डिसेंबर रोजी लग्नाच्या खरेदीसाठी वेगवेगळ्या खात्या वरून १ लाख ७० हजार रु. पाठविले
६ डिसेंबर रोजी १२:३० वा. दिपेवडगाव येथे लग्न
६ डिसेंबर रोजी ३:३० वाजता नववधू–वर ही कोदरी येथे आले आणि ४: ०० सुमारास नवरी पळून गेली.

#### नवरीला तीन दिवसांची पोलिस कोठडी

प्रीती हिला पोलिसांनी ताब्यात घेतल्या नंतर तिला न्यायालया समोर हजर केले असता तिला १० डिसेंबर पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

दैनिक वादळ वार्ता
केज । गौतम बचुटे

दोन लाख रु घेवून मंदिरात लग्न लावले अन् लग्ना नंतर उंबऱ्या वरचे माप ओलांडून नवरदेवाच्या घरात प्रवेश केला. त्या नंतर अवघ्या तास भरातच शौचाच्या बहाण्याने नवरी पळून गेली. तिचा पाठलाग करणाऱ्या नवरदेवाच्या नातेवाईकांनी तिला गाठताच तिने पोलिसांना फोन केला. त्या नंतर आलेल्या पोलिसांच्या समोर दोन लाख रु. घेऊन केलेल्या या बनावट लग्नाचे बिग फुटले. आता नवरा मुलगा पैसे गेले म्हणून डोक्याला हात लावून बसला आहे तर नवरी सुहागरात साजरी करण्या ऐवजी पोलिस कोठडीत आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील कोदरी ता. अंबाजोगाई येथील ३६ वर्ष वयाच्या तरुण नागेश देविदास जगताप याचे प्रल्हाद गुळभिले या संभाजीनगर येथील एजंटने १ लाख ९० हजार रु. घेऊन दि. ६ डिसेंबर रोजी १२:३० वा. दिपेवडगांव येथे हनुमानाच्या मंदिरात नागेश जगताप व प्रिती शिवाजी राऊत यांचे लग्न लावले. त्या नंतर ते सर्वजण कोदरी येथे गावी गेले. त्यावेळी नववधू प्रिती राऊत हिने तिला शौचास जाण्याचे बहाण्याने पळून गेली. दरम्यान ती पळून जात असल्याचे लक्षात



येताच गावातील एकाने तिला पहिले आणि त्याची माहिती नागेश जगताप आणि त्यांचे नातेवाईक यांना दिली. ते सर्वजण तिचा शोध घेत असताना प्रीती ही डिघोळअंबा पाटी जवळ मिळुन आली. तेव्हा त्यांनी तिला का पळुन चालली ? असे विचारले असता तिने पोलीसांना फोन केला असल्याचे सांगितले. त्या नंतर नागेश जगताप व त्याच्याशी लग्न झालेली प्रीती ही सर्वजण युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गेले. पोलीसांनी प्रिती हिची चौकशी केली असता प्रिती राऊत तिच्या सोबत आलेली मावशी नामे सविता रा. पुणे माया सतिष राऊत रा. चाकण पुणे तसेच आमचे ओळखीचे प्रल्हाद गुळभिले यांनी संगनमत नागेश जगताप यांच्या लग्न लावून देतो म्हणून १ लाख ९० हजार रु. ची फसवणूक केली. नागेश जगताप यांच्या तक्रारी वरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात एजंट सतिष प्रल्हाद गुळभिले नवरी प्रिती शिवाजी राऊत, त्याने तिची मावशी सविता, माया राऊत या चौघा विरुध्द गु. र. नं. ३०९/२०२५ भा. न्या. सं. ३१८(२), ३१८(४), ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे हे तपास करीत आहेत.

#### एजंट आणि मावशीसह नोटरी यांची पण चौकशी व्हायला हवी

पैसे घेऊन बनावट लग्न लावून देणारा एजंट प्रल्हाद गुळभिले, मुलीची मावशी असल्याचे सांगत असलेली सविता, माया सतीश राऊत आणि त्यांना शपथ पत्र करून देणारे नोटरी ड. एस. एस. बोराडे यांची ही कसून चौकशी व्हायला हवी. कारण अशा प्रकारे त्यांनी अनेकांची फसवून केली असावी.

#### लग्ना आधीच केले बनावट आधार कार्ड

लग्न होण्या एजंट आणि प्रल्हाद गुळभिले आणि त्यांच्या टोळीने प्रीती राऊत हिचे प्रीती नागेश जगताप या नावाने बनावट आधार कार्ड तयार केले असल्याची माहिती नागेश जगताप याने दिली.


#### पैसे तरी परत मिळावे

नागेश जगताप यांचे दोन लाख रु. ची फसवणूक झाली असून किमान पैसे तरी परत मिळावे अशी अपेक्षा आहे.

## संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान वाटप करा लहुदास रोडे तालुका अध्यक्ष इंटक

दैनिक वादळ वार्ता
परळी । प्रतीनिधी

मागील एक वर्षापासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान दिले जात नाही ते लवकरात लवकर वाटते करावे अन्यथा महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडले जाईल अशा अशायाची मागणी एका लेखी निवेदनाद्वारे परळी चे तहसिलदार तथा तालुका सचिव सांगायो यांच्या कडे राष्ट्रीय मंजूर कांग्रेस चे तालुका अध्यक्ष लहुदास रोडे यांनी केली आहे दरम्यान गेल्या दोन वर्षांपासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग



बांधवांना मासिक वेतन दिले जात नाही काही ना काहीतरी तांत्रिक कारण पुढे करून संबंधित अधिकाऱ्यांकडून संगणकीय प्रणाली वर डाटा अपलोड होत नाही, आधार लिंक नाही, बँक सेंडीग करून घ्या मोबाईल नंबर खात्याला लिंक करा असे अनेक तांत्रिक कारण पुढे करून अपंग बांधवांना मागील दोन वर्षांपासून संजय गांधी निराधार योजनोतील अपंग बांधवांना अनुदान वाटप करण्यात आले नाही, संगणकीय पोर्टल वर जुलमी व जाचक अटी व नियम न लावता सरसकट सर्व अपंग बांधवांना मानवी दृष्टिकोनातून मासिक वेतन सरकार मार्फत वाटप करावे अन्यथा महाराष्ट्रात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा एका लेखी निवेदनाद्वारे परळी चे तहसिलदार यांचे कडे राष्ट्रीय मंजूर कांग्रेस तालुका अध्यक्ष लहुदास रोडे यांनी केले आहे असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे पत्रकांना कळवले आहे.

## बदलत्या काळात शिक्षकांनी अपडेट राहुन शालेय शिक्षणासोबतच स्पर्धा परिक्षेचे तसेच संगणक युगात पारंगत कसे राहता येईल याचे शिक्षण विद्यार्थांना देणे आवश्यक–तहसीलदार राकेश गिड्डे

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

मराठा सेवा संघाच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम केज येथे गट शिक्षणाधिकारी कार्यालय सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणुन केजचे तहसीलदार राकेश गिड्डे,जी.बी.गदळे सर हे लाभले होते. शिक्षकांच्या योगदानाचे मूल्य अधोरेखित करण्या साठी,तसेच त्यांच्या कार्याचा समाजमान्य गौरव व्हावा या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात मान्यवरांचे मार्गदर्शनपर भाषणे झाली तहसीलदार राकेश गिड्डे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की,मी स्पर्धा



परीक्षा देऊन पहिल्या प्रयत्नातच तहसीलदार हे पद मिळवले.माझे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेतच पुर्ण झाले सध्या काळ बदलत आहे. शिक्षकांनी बदलत्या काळात अपडेट राहुन शालेय शिक्षणा सोबत स्पर्धा परिक्षेचे शिक्षण तसेच संगणक युगात पारंगत कसे राहता येईल याचे शिक्षण विद्यार्थांना देणे आवशक आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्यात एकुण सोळा शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.संगीता नवले, फुलसुरे,मोहन ढाकणे, व्यंकट चव्हाण,संध्याराणी कोल्हे,सुरेखा मोराळे, नवनाथ घुगे,रेखा धेंडे, नितीन हावळे,स्वाती वरपे,बाबुराव तांबडे, बालासाहेब लोखंडे, आश्रुबा गायकवाड, पुंडलिक पोपळघाट, शामल जाधव या शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी कार्यक्रमासाठी संघटनेचे पदाधिकारी नागनाथ जाधव जिल्हाध्यक्ष, म.से.सं.बीड शिवश्री डॉ. भाऊसाहेब चाळक जिल्हा उपाध्यक्ष म.से.सं. बीड,दत्तात्रय चाटे शिक्षण विस्तार अधिकारी,हनुमंत भोसले सामाजिक कार्यकर्ते,केज,हनुमंत घाडगे ज्येष्ठ साहित्यिक, केज,डॉ.हनुमंत सौदागर, जनार्धन सोनवणे ज्येष्ठ साहित्यिक,केज,शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छावा संघटना,बीड भाई मोहन गुंड नेते,शेकाप,केज विनोद शिंदे जिल्हाध्यक्ष, म.से.सं,समन्वयक,बीड गोविंद नाना शिनगारे, केज,राहुल खोडसे जिल्हाध्यक्ष,संभाजी ब्रिगेड बीड यांसह विविध मान्यवर,शिक्षक व अधिकारी उपस्थीत होते.

## श्रीनिजा फार्मर प्रोडूसर कंपनीच्या हमीभाव केंद्राचा शुभारंभ;सोयाबीनचा हमीभाव ५३२८

दैनिक वादळ वार्ता
हनुमंत चंदनकर । नांदेड

नांदेडच्या नायगाव टाकळगाव येथे श्रीनिजा फार्मर थोडे सर कंपनी हमीभाव केंद्राचा आज दिनांक ८ डिसेंबर रोजी शुभारंभ करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात महालक्ष्मी देवीची पूजा करून झाली हमीभाव केंद्राचे उद्घाटन माननीय चेअरमन खरेदी विक्री संघ नायगावचे श्रीनिवास चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी प्रगतशील शेतकरी गंगाधर पाटील मोरे पंडित पाटील सुगाव हणमंतराव पाटील बैठकवलीकर शिवाजी शिंदे पळसगावकर माजी सरपंच माधवराव पाटील पळसगावकर चेअरमन दत्तात्रय पाटील पांढरे माननीय चेअरमन सेवा सोसायटी लोहगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत तर शेतकरी व्यंकटी संभाजी जाधव



निळेगव्हाण नारायण गणपती पाटील सोंडे शेळगाव छत्री गजानन बाबाराव कदम वंजारवाडी तुकाराम दत्ता कदम वंजारवाडी या शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर मला न हमीभाव केंद्राची सुरुवात केली यावेळी मान्यवर् व शेतकऱ्यांचा श्रेणीचा फार्मर प्रोडूसर कंपनीच्या वतीने सत्कार करण्यात आला प श्रीनिजा फॉर्म प्रोडूसर कंपनीने आतापर्यंत पंधराशे पेक्षा अधिक ऑनलाइन तसंच ऑफलाईन नोंदणी केले आहेत सोयाबीनला पाच हजार ५३२८ रुपये हमीभाव खरेदीने खरेदी सुरू केली आहे शेतकऱ्यांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन श्रीनिजा फार्मर प्रॉडक्ट कंपनीचे वेंकटेश गंगमवार लोहगावकर यांनी केले आहे खरेदी केंद्रावर पार्किंगची व्यवस्था शेतकऱ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या मोकळ्या परिसरात हमीभाव केंद्राचा शुभारंभ करण्यात आला

## संविधानामुळे भारतीयांची प्रगती झाली–माजी न्या.यशवंत चावरे

दैनिक वादळ वार्ता
आशा रणखांबे । नवी मुंबई

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या उद्देशिके नुसार भारतात समाजवाद ,लोकशाही प्रजासत्ताक व्यवस्था निर्माण करून भारताचे सार्वभौमत्व, अखंड व एकात्म भारत ठेवण्यासाठी या देशातील प्रत्येकाला न्याय देण्याची व्यवस्था निर्माण केली.त्यामुळे सर्व भारतीयांची उन्नती झाली.विशेषत: महिला आणि अनुसूचित जाती जमातींना प्रतिष्ठेने जगण्याची , सन्मान प्राप्त करण्याची संधी मिळाली. असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती डॉ .यशवंत चावरे यांनी केले . खारघर येथील व्हॅली गोल्फ कोर्स वर आयोजित संविधान जागरुकता व्याख्यान मालेत प्रमुख



पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना मराठी,हिंदी साहित्यिक, विचारवंत प्रा. दामोदर मोरे म्हणाले, भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच राज्यक्रांती पासून नव्हे तर बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून घेतली होती हे आपल्याला सप्रमाण सांगता येते.स्वातंत्र्य , समता , बंधुता , न्याय आणि धर्मनिरपेक्षता हे भारतीय लोकशाहीचे संविधानिक पंचशील आहे.लोकशाहीच्या रक्षणासाठी सर्व नागरिकांनी या पंचशीलाचे पालन केले तरच देशाची एकता आणि अखंडता कायम राहील.प्रारंभी अजय फुलमाळी,जनार्दन लाखन तसेच सम्यक सामाजिक संस्थेचे डी.पी.कोपरकर आणि शरद कांबळे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी संविधानातील उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद लोणे, संकेत साखरे, संदेश जाधव आणि राजेश नंदगवळी यांनी प्रचंड मेहनत घेतली.आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# कोकणात मळभाचे सावट

पूर्वी वर्षभरात कृषीची एक दैनंदीनी होती. आता तसे काही उरले नाही. धुक्यात रस्ते हरवतात. साहजिकच या वातावरणाचा परिणाम फळबागायतींवर दिसतो. यावर्षी आंबा, काजू पीक चांगले येईल अशी अपेक्षा कोकणातील बागायतदार शेतकरी बाळगून आहेत. आंबा, काजूंवर होणारी फवारणी, कीटकनाशक, खत, बागायतींची बेनावळ यावर हजारो रुपये खर्च होतात. कधी–कधी बागायतींवर होणाऱ्या खर्चाचे पैसेही मिळणाऱ्या उत्पन्नांतून होत नाहीत. कोकणात आंबा, काजू बागायतींमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. यामुळे कोकणामध्ये वातावरणातील होणाऱ्या बदलाचे फार मोठे परिणाम होऊ शकतात. थंडी नाही, उन्हाळाही नाही असं आकाशात मळभ असलेल्या वातावरणाने सध्या कोकण ग्रासून गेले आहे.कोकणात नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाऊस होता. थंडी कधी सुरू होणार या प्रतीक्षेत अवघं कोकण होतं. नोव्हेंबरमध्ये पाऊस असल्याने भातपिकाचं काय होणार याच चिंतेत कोकणातील शेतकरी होता; परंतु एकदाचा पाऊस थांबला तशी भातशेतीची कापणी आणि आणखी काही शेतींची कामे शेतकऱ्यांनी आटोपली, भातकापणी आणि भात भरून ठेवण्याचं शेतकऱ्याचं काम आटोपल असलं तरीही कोकणातील आंबा, काजू, जांभूळ, रतांबा बागायतदार शेतकरी चिंतेत आहेत. ऋतुचक्र बदललं आहे. वातावरणातील सतत घडणारे बदल. फळ उत्पादनावर संकट बनून आहेत. पहाटे थंडी, दुपारी कडक उन्हाळा असे विचित्र वातावरण आहे. एकीकडे ऋतुचक्रातील बदल वातावरण सतत बदलत राहिल्याने त्याचा विपरित परिणाम कोकणातील विविध फळपिकांवर होत आहेत. केवळ या वातावरण बदलाचा परिणाम फळपिकांवरच होतो असे नाही, तर कोकणातील मासेमारी व्यवसायावरही त्याचा विपरित परिणाम जाणवत आहे. एकीकडे थंडी आहे असं म्हणता येत नाही किंवा थंडी झालीच नाही असेही म्हणता येणार नाही. या महिन्यात आंबा, काजू, रतांबा याला उत्तम मोहोर येतो. या आलेल्या मोहोरावर पूर्वी आंबा बागायतदार शेतकरी आणि आंबा कलम बाग कराराने घेतली जायची.आंब्याच्या मोहोरावर आंबा बागेची बोली लागायची; परंतु गेल्या काही वर्षातील या हवामानाच्या बदलांमुळे आंबा बागायतदार आणि आंबा व्यावसायिक यांनी मोहोरावर आंबा किती येईल त्याचे किती पैसे होतील म्हणजे किती पेटी आंबे होतील असे सर्वच व्यवहार या बेभरवशामुळे आता होत नाहीत. याचे कारण मोहोर पाहून आंब्यांच्या झाडांची बोली करायची आणि मधल्या कालावधीत कोणत्यातरी रोगाने पीकच आले नाही तर सगळच बिघडायचं यामुळे पूर्वी सऱ्हास आंबा बागायतदार मोहोरावर आंब्याची बोली व्हायची ती आता फार कमी झाली. मोहोरावर बाग करायला घेण्यामध्ये बऱ्याचवेळा आंबा बागायतदार शेतकऱ्याचे नुकसान व्हायचे; परंतु हा सर्व मोहोरावरचा व्यवहार बोलीवर विश्वासावर चालायचा. काही व्यावसायिक आंब्याच्या झाडावरील मोहोर पाहून त्या आंब्याच्या झाडावर किती पेट्या आंबे मिळतील याचा अचूक अंदाज बांधणारे आंबा व्यवसायात मुरलेले व्यावसायिक होते. आजही आहेत. आजही मोहोरावर बाग देण्याचा आणि बाग घेण्याचा व्यावसायिक व्यवहार होत असतो; परंतु वातावरणातील सतत होणाऱ्या बदलांमुळे कोणालाच काही अंदाज वर्तवणे अवघड झाले आहे. एकीकडे थंडी येतेच म्हणेपर्यंत चार–दोन दिवसांतच थंडी गायब झाली आहे, तर दुसरीकडे मध्येच येणारी उष्णता यामुळे आंबा, काजू बागायतीचे पुढे काय होणार? याची चिंता आंबा, काजू बागायतदार शेतकऱ्यांना सतावत आहे.कोकणातल अर्थकारण आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम या सर्व फळपिकांवर अवलंबून आहे. याबरोबरच मासेमारीचा व्यवसायदेखील अनियमित झाला आहे. या सर्वांचा परिणाम हा होतच असतो. अलीकडे काही दिवस दिवसभर ढगाळ वातावरण आहे. वातावरणातील हे बदल नेमके कसे आहेत त्याचा परिणाम कशा–कशावरती संभवतो हे सगळ ठरवणं, सांगणं कठीण आहे. काही वर्षांत वातावरणातील बदल सारच अनिश्चित करत आहे. पूर्वी वर्षभराच कृषीच शेड्युल होतं आता तस काही उरलं नाही. खूप बदललं. मध्येच दाट धूकं येतं; परंतु आता तर कोकणात पहाटेच्यावेळी अनेक मार्गांवर धूकं दिसतं. धुक्यात रस्ते हरवतात. साहजिकच या वातावरणाचा परिणाम फळबागायतींवर झालेला दिसतो. सध्याच्या या कोकणातील हिवाळ्यातल्या मळभ असणाऱ्या वातावरणाचाही मोठा परिणाम संभवतो. यावर्षी तरी आंबा, काजू पीक चांगलं येईल अशी अपेक्षा बाळगून कोकणातील बागायतदार शेतकरी आहे. आंबा, काजूंवर होणारी फवारणी, कीटकनाशक, खत, बागायतींची बेनावळ यावर हजारो रुपये खर्च होतात. कधी–कधी बागायतींवर होणार खर्चाचे पैसेही मिळणाऱ्या उत्पन्नांतून होत नाहीत; परंतु यावर्षी आंबा बागायतीमधून आंबा पीक कमी आलं, तर पुढच्यावर्षी जादाच पीक येईल अशी अपेक्षा ठेवून आंबा बागायतदार राबत असतो. कोकणात आंबा, काजू बागायतींमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. यामुळे कोकणामध्ये वातावरणातील होणाऱ्या बदलाचे फार मोठे परिणाम होऊ शकतात. थंडी नाही, उन्हाळाही नाही असं आकाशात मळभ असलेलं वातावरण कोकणात आहे. हापूस आंबा म्हटल्यावर कोणालाही फक्त कोकणच आठवतं. गुजरात, कर्नाटक या राज्यातूनही आंबा पीक होतं. कोकणातील हापूस आंब्याशी स्पर्धा करण्यासाठी गुजरात, कर्नाटक राज्यातून आंबा आणला जातो. 'हापूस आंबा' म्हणून विक्री करण्याचा प्रयत्नही केला जातोय. एकीकडे निसर्गाचा बेभरवसा, त्याचं संकट त्यातच कमी म्हणून की काय कोकणातील आंबा आणि काजू व्यवसायातही परराज्यातून मोठ्या प्रमाणावर आंबा, काजू आणून बाजारात विक्रीला आणण्याचा प्रयत्न होताना दिसतो. कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांनी सावध असण्याची आवश्यकता आहे.कोकणात सर्वच बाजूने स्पर्धा आहे. आजकाल कोकणातील हापूस आंबा बाजारात येण्यापूर्वी कर्नाटकातील आंबा कोकणातील हमरस्त्यावर येत असतो. कोकणात येणाऱ्या पर्यटकांना कर्नाटकचा हा बाजारात येणारा आंबा हा कोकणचा हापूस म्हणून विक्री करणारेही अनेक आहेत. या कर्नाटक आंबा विक्रीमध्ये आंबा पॅक करताना कोकणातील मराठी दैनिकांचा कागद आंबा पेटी पॅकिंगमध्ये वापरला जातो. जेणेकरून कर्नाटकचा तो आंबा कोकणातलाच आंबा आहे असे वाटण्यासाठी आंबा पेटी पॅकिंगमध्ये कोकणातील स्थानिक वृत्तपत्रांचा रद्दी कागद वापरला जातो. मार्केटमध्ये फसवणुकीचा कसा फंडा वापरला जातो त्याचे हे एक–एक नमुनेदार उदाहरण आहेत.मुंबईच्या बाजारातही गुजरात, कर्नाटकचे आंबे कोकणचा हापूस म्हणून विकण्याचा प्रयत्न होतो. आता तर वलसाडच्या हापूसने आपल्या मानांकनासाठी स्पर्धा सुरू केली आहे. पण ज्यांनी कोकणच्या हापूसचा स्वादिष्टपणा चाखलेला आहे त्याला कोकणातील हापूस आंब्याच्या वासावरूनही आंबा कोकणचा आहे की बनवेगीरी आहे हे समजून येते. कोकणच्या हापूसची बरोबरी इतर कोणत्या राज्यातील आंब्याला करता येणारी नाही. कोकणातील हापूस त्यांचा रंग, त्याचे देखणेपण, त्याचा स्वाद आणि सगळंच कुठेच सापडणार नाही; परंतु ऋतुचक्र आणि हवामानातील बदलाच्या परिणामांच्या कचाट्यात मात्र कोकणचा हापूस, काजू सारेच सापडलेय यामुळेच कोकणातील बागायतदार चिंतातूर आहेत.

# लाडेगाव,दिपेवडगाव, लाडेवडगाव च्या कृषी पंपांना आठ तास अखंडित वीजपुरवठ्याची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लाडेगाव,दिपेवडगाव व लाडेवडगाव या गावांतील कृषि पंपधारक शेतकऱ्यांना दररोज किमान आठ तास अखंडित आणि उच्च दाबाने वीजपुरवठा द्यावा, अन्यथा तीव्र बेमुदत आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेकडून देण्यात आला आहे.या मागणी साठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी अंबाजोगाई विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. चाटे यांना सोमवारी दि. ८ डिसेंबर रोजी निवेदन सादर केले.होळ येथील ३३ के.व्ही.विद्युत उपकेंद्रा तून लाडेगाव,दिपेवडगाव आणि लाडेवडगाव परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी वीजपुरवठा केला जातो.मात्र गेल्या काही दिवसांपासून या गावांमध्ये गंभीर स्वरूपाची लोडशेडिंग होत असून,सुमारे ३० ते ३६ तासाच्या खंडानंतर केवळ सहा तास वीज पुरवठा दिला जातो,तेही अत्यंत कमी दाबाने,अशी तक्रार शेतकऱ्यांनी निवेदनात मांडली आहे.यामुळे रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनाची व्यवस्था कोसळली असून,पिकांना आवश्यक तेवढे पाणी न मिळाल्याने मोठ्या प्रमाणात वाळवी लागण्याची भीती निर्माण झाली आहे.यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असून, परिसरात महा वितरण विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या गंभीर अडचणी लक्षात घेऊन, दररोज अखंडित आठ तास उच्च दाबाने शेती पंपांना वीज पुरवठा तात्काळ सुरळीत करावा, अशी मागणी कुलदिप करपे यांनी निवेदनात केली.पुढील तीन दिवसांत वीज पुरवठ्याची स्थिती सुधारली नाही तर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली होळ ३३ के.व्ही.उपकेंद्र व उपअभियंता कार्यालया समोर बेमुदत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशाराही त्यांनी दिला आहे.शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्यासाठी संघटना सर्वतोपरी साथ देईल,असेही करपे यांनी सांगितले.महा वितरण कडून आता या निवेदना वर काय पाऊल उचलले जाते याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



# केज येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

## सोळा उपक्रमशील शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ केज शाखेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळा रविवार रोजी शिक्षणाधिकारी कार्यालय, केज येथे उत्साहात संपन्न झाला. केज तालुक्यातील उपक्रमशील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक महादेवी फुलसुरे जि प प्रा शाळा धर्माळा, मोहन ढाकणे जि प प्रा शाळा सारणी (सां), व्यंकट चव्हाण जि प प्रा शाळा हनुमाननगर लाडेवडगाव, संध्याराणी कोल्हे जि प प्रा शाळा लाखा, सुरेखा मोराळे जि प प्रा शाळा साळेगाव, नवनाथ घुगे जि प प्रा शाळा होळ, रेखा धेंडे जि प प्रा शाळा बोरीसावरगाव, संगीता नवले जि प प्रा शाळा सोनिजवळा, नितीन हावळे जि प प्रा शाळा दरडवाडी ,स्वाती वरपे जि प प्रा शाळा देवगाव, बाबुराव तांबडे जि प प्रा शाळा ढाकणवाडी ,बालासाहेब लोखंडे जि प प्रा शाळा पांडुरंगवस्ती पैठणे, आश्रुबा गायकवाड जि प प्रा शाळा बावची, पुंडलिक पोपळघट जि प प्रा शाळा बोरगाव, शामल जाधव जि प प्रा शाळा जाधवजवळा, मोहसिन साबेर कुरेशी जि प प्रा शाळा लाखा उर्दू यांना सन्मानचिन्ह सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे तहसीलदार राकेश गिड्डे,जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव जी बी गदळे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव,शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले केज, ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत घाडगे, डॉ.हनुमंत सौदागर जनार्धन सोनवणे, छावा चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे शेकाप चे भाई मोहन गुंड नेते, शेकाप, गोविंद शिनगारे संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे मराठा सेवा संघ विभागीय सचिव रामकीसन मस्के,योगेश अंबाड आदींची उपस्थिती होती यावेळी बोलताना तहसीलदार राकेश गिड्डे म्हणाले शिक्षक हा समाजाचा दिशा–दर्शक दीपस्तंभ आहे समाजनिर्मिती करणे आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक तयार करणे हे कर्तव्य शिक्षक पार पाडतात. नव्या पिढीचे शिल्पकार आहेत असे मत व्यक्त करून पुरस्कार प्राप्त शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. केज तालुक्यात उत्कृष्ट अध्यापन करणारे अनेक शिक्षक शासकीय पुरस्कारापासून वंचित राहतात त्यांना अशा पुरस्कारातून ऊर्जा मिळते असे मत हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले. मराठा सेवा संघाने उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन करून पुरस्काराच्या माध्यमातून शिक्षकांना केले. यामुळे अजून उत्तम काम करण्यास त्यांना प्रेरणा मिळेल असे मत सुनील केंद्रे यांनी व्यक्त केले. चांगले विद्यार्थी घडवणाऱ्या शिक्षकांच्या पाठीशी आम्ही कायम होत असे मत भाई म्हणून भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले. चांगले अध्यापन करणारे शिक्षक नेहमी विद्यार्थ्यांच्या आठवणीत राहतात असे मत जी बी गदळे यांनी व्यक्त केले. गुरुजींनी दिलेल्या शिक्षणामुळेच विद्यार्थी घडत असतात असे मत हनुमंत घाडगे यांनी व्यक्त केले. पुरस्कारातून शिक्षकांना नवीन प्रयोग करण्यासाठी ऊर्जा मिळत असते असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवराज हिरवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे जयदीप देशमुख, किशोर भालेराव, युवराज हिरवे, महादेव ढाकणे चंद्रकांत मोरे, तुषार पाटील, दयानंद खोपे, आण्णा कदम, आतिश गाढवे, राहुल देशमुख आदींनी परिश्रम घेतले.पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी ,शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे यांनी तर आभार व्हि एम यादव यांनी केले.

# टाकली–घोडामाग रस्त्याच्या दुरवस्थेमुळे चारा घेऊन जाणारी पिकअप गाडी झाडाला धडकली; मोठी दुर्घटना टळली

## टाकली–घोडामाग परिसरातील ग्रामस्थांचे हाल; खराब रस्त्यामुळे वारंवार अपघाताचा धोका

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथून घोडामागच्या दिशेने गुरांसाठी उसाच्या बांडीचा चारा घेऊन निघालेली एक बोलेरो पिकअप गाडी टाकळीकडे जात असताना, प्रतापूरपासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या अतिशय दुरवस्थेमुळे अपघातातून थोडक्यात बचावली. रस्त्यावरचे मोठे दगड आणि उंच भाग यामुळे गाडी घसरली; मात्र चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.



तळोदा आणि घोडामाग परिसरातील गावांना जोडणारा हा रस्ता अनेक वर्षांपासून कच्चा आणि अत्यंत खराब अवस्थेत आहे. हा रस्ता इतका अरुंद आहे की, रस्त्यावरून एका वेळी एकच वाहन जाऊ शकते. दुसरे वाहन आल्यास त्याला बाजूला जाण्यासाठी जागा नसते. यामुळे या भागातील ग्रामस्थांना आपल्या गुरांसाठी चारा आणताना किंवा दैनंदिन कामांसाठी तळोद्याला ये–जा करताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. दिनांक ७ रोजी चारा भरलेली पिकअप गाडी तळोद्याकडून टाकलीकडे निघाली असताना, डोंगराळ भागात उंच चढाव आल्याने आणि गाडीत अधिक चारा भरलेला असल्याने ती अचानक घसरली. चालकाने त्वरित ब्रेक दाबण्याचा प्रयत्न केला, परंतु ब्रेक लागले नाहीत.

या गंभीर परिस्थितीत, चालकाने क्षणाचाही विलंब न लावता प्रसंगावधान राखले आणि भरलेली गाडी थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाच्या दिशेने वळवली. गाडी झाडाला धडकल्यामुळे ती जागेवर थांबली आणि पलटी होण्यापासून वाचली. जर चालकाने वेळीच हा निर्णय घेतला नसता, तर मोठी जीवितहानी किंवा वित्तहानी झाली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून या रस्त्याचे पक्कीकरण केले जात नाही. त्यामुळे येथे अपघाताचा धोका वाढला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे. तळोदा या मुख्य ठिकाणी ये–जा करण्यासाठी हा एकमेव रस्ता असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्ता तातडीने पक्का करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# नंदुरबारमध्ये १.२१ लाख रुपयांची कॉपर वायर चोरी उघड! दोन आरोपी जेरबंद, १५२ किलो केबल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तालुका पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या कॉपर वायर चोरीचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. पोलिसांनी तब्बल १,२१,६०० किमतीची १५२ किलो कॉपर वायर हस्तगत केली असून, याप्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

दिनांक १०/११/२०२५ ते २९/११/२०२५ दरम्यान तालुका पोलीस ठाणे हद्दीतील आक्राळे, ठाणेपाडा, आखातवाडे, गंगापूर, नवागाव, इंद्रिहट्टी येथील शेत शिवारातील सुझलॉन टॉवरमधील कॉपर केबल धारदार हत्याराने कापून चोरी झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाणे येथे ०१/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना, पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त माहिती मिळाली. तलवाडे (ब्रु.) येथील रोहित ठाकरे याने साथीदाराच्या मदतीने ही केबल चोरी केल्याचे समजले. माहितीच्या आधारे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी पथक रवाना केले. पथकाने तलवाडे येथे जाऊन संशयित आरोपी रोहित सुभाष ठाकरे (वय ३०) याला ताब्यात घेतले. त्याने चौकशीत आपला साथीदार युवराज मोहन भिल (वय ३०, रा. नवागाव इंद्रिहट्टी) याच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींनी चोरी केलेला माल विक्री करण्याच्या उद्देशाने नंदुरबार ते दोंडाईचा रोडवर रजाळे फाटा परिसरातील झाडाझुडूपात लपवून ठेवला असल्याचे सांगितले. आरोपींच्या मदतीने पोलिसांनी १,२१,६००/– किमतीची, १५२ किलो वजनाची सुझलॉन टॉवरमध्ये वापरण्यात येणारी कॉपर केबल हस्तगत केली आहे.ही कामगिरी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउपनि मुकेश पवार, विकास गुंजाळ, पोहेकॉ/ दिनेश चित्ते, मुकेश तावडे, विशाल नागरे, मोहन ढमढेरे, सचिन वसावे, नितीन गांगुर्डे, पोकॉ/ अभय राजपुत, राजेंद्र काटके यांच्या पथकाने केली.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी १३ डिसेंबरला नागपूरमध्ये राज्यव्यापी धरणे आंदोलन!

## सेविका-मदतनीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा आणि ग्रॅच्युटी लागू करण्याच्या मागणीसाठी हिवाळी अधिवेशनादरम्यान एल्गार

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी मोलगी**

महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या विविध प्रलंबित आणि जीवनमानाशी निगडित मागण्या शासनाकडे दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी समन्वय समितीने आता निर्णायक पाऊल उचलले आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी, हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर १३ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. राज्यभरातील हजारो अंगणवाडी कर्मचारी या आंदोलनासाठी एकत्र येणार असून, शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा मिळणे, वेतनात भरीव वाढ करणे आणि सेवानिवृत्तीनंतर पेन्शन व ग्रॅच्युटी लागू करणे या प्रमुख मागण्यांसाठी हा एल्गार पुकारण्यात आला आहे. समन्वय समितीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, राज्यभरातील अंगणवाडी कर्मचारी १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडियम, धनतोली, नागपूर येथे एकत्र जमून ठामपणे धरणे आंदोलन करतील. संयमाची सीमा संपल्याने, आता या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हक्कांसाठी थेट विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आवाज उठवण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनामध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी खालील महत्त्वपूर्ण मागण्यांवर जोर दिला आहे: शासकीय कर्मचारी दर्जा: अंगणवाडी सेविका-मदतनीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा तत्काळ लागू करण्यात यावा. वेतन व भत्ते: वेतनात शासकीय पद्धतीचे सुधारित नियम लागू करून वाढ करावी, तसेच केंद्र सरकारने महागाईचा विचार करून मानधनात भरीव वाढ करावी. पेन्शन व ग्रॅच्युटी: सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅच्युटीची अंमलबजावणी करावी. सेवासमाप्तीनंतर पेन्शन योजना लागू करावी. प्रोत्साहन भत्त्याबाबत: कामावर आधारित प्रोत्साहन भत्त्याची सक्ती रद्द करून, तो सरसकट मासिक मानधनात समाविष्ट करावा. तांत्रिक समस्या: ऋठड प्रणालीतील वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणी तत्काळ दूर करण्यात याव्यात. थकीत मोबदला: 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेअंतर्गत केलेल्या कामाचा थकीत मोबदला त्वरित अदा करावा. उन्हाळी सुट्टी: कर्मचाऱ्यांची उन्हाळी सुट्टी पंधरा दिवसांऐवजी एक महिना करावी. समन्वय समितीचे निमंत्रक युवराज बैसाणे, संजय मापले, जयश्री वाबळे, रामकृष्ण पाटील,चंदा नवले,संगीत गागरे आणि सत्यभामा रंगारी, राजू पाटील ,वकील पाटील,अमोल बैसाने यांनी या ऐतिहासिक आंदोलनात कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने एकदिलाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.




# मोड-खरवड पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील मोड ते खरवड या महत्त्वाच्या मार्गावरील निझरा नदीवरील पुलाच्या सद्यस्थितीमुळे स्थानिक प्रवाशांना अडचणी येत आहेत. काही वर्षांपूर्वी बांधलेल्या या पुलावरील पृष्ठभाग काही ठिकाणी उखडला असून, त्यामुळे पुलावर खड्डे निर्माण झाले आहेत. परिणामी, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना विशेषतः रात्रीच्या वेळी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

निझरा नदीला पूर आल्यास मोड ते खरवड कडे होणारी वाहतूक पूर्वी पूर्णपणे थांबायची. हा पूल तत्कालीन आमदार उदेसिंग पाडवी यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाल्यानंतर बांधण्यात आला, ज्यामुळे परिसरातील वाहतुकीची मोठी सोय झाली.मोडकडून शहाद्याकडे आणि शहाद्याकडून तळोद्याकडील गावांकडे जाणाऱ्या वाहनांसाठी हा पूल अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.



सध्या पुलाच्या पृष्ठभागावर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत आणि स्लॅब उखडल्याने लोखंडी सळ्या बाहेर आल्या आहेत.यामुळे वाहनधारकांना प्रवास करताना मनस्ताप होत असून, वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच, दुचाकीस्वारांना अधिक काळजी घ्यावी लागत आहे.

परिसरातील गावांतील नागरिकांनी त्यांच्या सुरक्षित आणि सुलभ प्रवासासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या समस्येची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि वाहतूक व्यवस्था पूर्ववत ठेवण्यासाठी पुलाची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

# आमच्या शहरात असे कधीच घडले नव्हते-एकनाथ खडसे

**दैनिक वादळ वार्ता**

**मुक्ताईनगर (वृत्तसंस्था)**-आमदार चंद्रकांत पाटील हे गुर्मीमध्ये आणि मस्तीमध्ये आहेत. त्यांची प्रवृत्ती गुंडागर्दीची आहे. यापूर्वीदेखील त्यांच्यावर असे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांनी काल मुक्ताईनगरमध्ये १००-सव्वाशे दुचाकीवर दोनशे अडीचशे गुंड जे वाळू माफिया आहेत त्यांना बाहेरुन बोलावून घेत दहशत पसरवण्याचे काम केले आहे,असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला आहे.



एकनाथ खडसे म्हणाले की, काल सकाळपासून मुक्ताईनगर शहारामध्ये दहशतीचं आणि भीतीचे वातावरण पसरवण्याचा प्रयत्न आमदारांच्या केला गेला. या ठिकाणी शिवसेनेचे आमदार आहेत असे म्हणत त्यांनी नाव न घेता शिवसेना आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे. दुपारनंतर त्यांनी बाहेरुन गुंड आणले त्यांच्याकडे शस्त्र होती. आमदार गाडी घेऊन पुढे चालायचे आणि त्यांच्यामागे १०० सव्वाशे दुचाकीवर दोनशे अडीचशे गुंड जे वाळू माफिया होते जे जळगाव, भुसावळ आणि बुऱ्हाणपूरचे होते.एकनाथ खडसे म्हणाले की, यातील बरेच वाळू माफियांचे चेहरे मला परिचित आहेत. मी मंत्री असताना त्यांना बऱ्याचदा मध्येही टाकले होते. या सर्वाच्या सहित दहशतीचे वातावरण पसरवण्याचा प्रयत्न स्थानिक आमदारांनी केला. आमदारांना विचारले तर मला रस्ताने जाण्यास मनाई आहे का? असा सवाल करत असल्याचे खडसेंनी म्हटले आहे.एकनाथ खडसे म्हणाले की, मतदान केंद्रामध्ये दोन दोन तास बसून राहणं मतदारांना धाक दाखवत दडपशाही करणे आणि काही ठिकाणी मारहाण करण्याचे प्रयत्न केले. मुक्ताईनगर हे शांत शहर आहे. यापूर्वी असे कधीही झालेले नाही. काल आमदारांच्या कार्यकर्त्यांनी विरोधकांना जबर मारहाण केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. आता सर्व चित्रीकरण घेत आचारसंहिता भंग केल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार आहोत.

एकनाथ खडसे म्हणाले की, मुक्ताईनगरमध्ये जर आम्ही दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला असेल असा आरोप आमदार करत असतील तर त्यांनी त्यांच्याकडे जर पुरावे असतील तर आमच्याविरोधात गुन्हा दाखल करावा.

# नंदुरबार पोलीस दलाचे कठोर पाऊल नायलॉन मांजा वापरल्यास थेट गुन्हा दाखल

## जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस. यांचे नागरिकांना भावनिक आवाहन: पर्यावरणपूरक उत्सव साजरा करा!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंगबाजीच्या उत्साहात होणारे अपघात आणि जिवीतहानी टाळण्यासाठी नंदुरबार जिल्हा पोलीस दल आता सज्ज झाले आहे. नायलॉन माजा, चायनिज मांजा किंवा कोणत्याही धोकादायक कृत्रिम मांजाचा वापर, विक्री अथवा साठा केल्यास संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस. यांनी या संदर्भात नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, हा घातक मांजा मानवी जीवासाठी तसेच पशुपक्ष्यांसाठी गंभीर धोका निर्माण करतो. मागील काही वर्षांत या मांजामुळे अनेक गंभीर जखमा, अपघात आणि दुर्दैवी मृत्यूच्या घटना घडल्या आहेत, जी एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.

**विशेष पथके सक्रिय; कठोर कारवाईचा इशारा**

या प्रतिबंधित मांजाच्या विक्री आणि वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हयाभरातील बाजारपेठांमध्ये, गल्लीबोळयांमध्ये तसेच प्रमुख ठिकाणी संयुक्त पथके तयार करून कारवाईची मोहिम सुरू करण्यात आली आहे. श्रवण दत्त.एस.यांनी माहिती दिली की, प्रतिबंधित मांजाची विक्री, साठा, वाहतूक तसेच पतंगबाजी करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पर्यावरण संरक्षण कायदा व इतर प्रचलित कायद्यान्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पोलीस दलाने नागरिकांना पतंग उडवताना पर्यावरणपूरक सुरक्षित मांजाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, पतंग उडवताना सामाजिक भान ठेऊन कोणत्याही प्रकारे जिवीतहानी होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले आहे. मोटारसायकल चालवताना योग्य त्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांना कुठेही नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक किंवा वापर आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नंदुरबार जिल्हा पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असून सर्वांनी मिळून सुरक्षित आणि आनंददायी सण साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रुप ग्रामपंचायत जासई तर्फे स्मशान भूमी येथे वृक्षारोपण



**दैनिक वादळ वार्ता**
**उरण | प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत जासई तर्फे मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियान अंतर्गत स्मशानभूमी येथे वृक्ष लागवड करण्यात आली.उरण तालुक्यातील जासई ग्रामपंचायतचे उपसरपंच सृष्टी म्हात्रे,ग्रामपंचायत सदस्य आदित्य घरत, वीणा घरत, सुलोचना घरत, अश्विनी नाईक, जयश्री घरत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. ग्रामपंचायत जासई तर्फे केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या सर्वच आदेशाचे, सूचनांचे पालन केले जाते. शासनाच्या सेवा सवलती शेवटच्या घटका पर्यंत पोहोचविले जाते. शासनाने केलेल्या आवाहना नुसार तसेच मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियान अंतर्गत जासई ग्रामपंचायत तर्फे वृक्षारोपण करण्यात आले.झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, निसर्गाचे संवर्धन, संरक्षण करा असा संदेश ग्रुप ग्रामपंचायत जासईच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

## समता सप्ताहाचे तळोदा येथे उत्साहात उद्घाटन: दिव्यांग विद्यार्थ्यांना समाजात सन्मानाने उभे करण्यासाठी

# शिक्षकांनी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर यांचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून 'समान संधी दिवस' आणि त्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या 'समता सप्ताहा'चे नुकतेच उत्साहात उद्घाटन करण्यात आले. दिव्यांग बालकांना समाजाने समतेची संधी दिली आहे. त्यामुळे दिव्यांगांच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही शाळा आणि शिक्षकांची प्रमुख जबाबदारी असून, त्यांनी त्यासाठी संपूर्ण प्रयत्न करावेत, जेणेकरून दिव्यांग सन्मानाने जीवनात उभे राहतील, असे कळकळीचे आवाहन गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर यांनी यावेळी केले.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर हे होते. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव, केंद्रप्रमुख रंजना निकुंभे व जगन्नाथ मराठे, मुख्याध्यापक मिलिंद ढोडरे, लेखा सहाय्यक रावसाहेब पाटील, डाटा एन्ट्री ऑपरेटर कैलास सोनवणे, तसेच तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थी असलेल्या शाळांचे मुख्याध्यापक, विशेष शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात गटशिक्षणाधिकारी धनगर म्हणाले की, दिव्य शक्ती असलेल्या दिव्यांग विद्यार्थी व पालकांचा आत्मसन्मान जपला पाहिजे. त्यांच्यातील कलागुण विकसित करून त्यांना त्यात पारंगत करण्यासाठी सर्व शिक्षक व पालकांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाईल.

शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध शासकीय योजना, त्यासाठी आवश्यक असणारे यूआयडी कार्ड व इतर कागदपत्रांची सविस्तर माहिती दिली. दिव्यांगांना समान संधी देऊन त्यांच्या प्रगतीसाठी शिक्षण विभाग सदैव पाठीशी राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.यावेळी केंद्रप्रमुख रंजना निकुंभे, विशेष शिक्षक दयाराम जांभोरे, लालसिंग खर्डे, मुख्याध्यापक मिलिंद




धोदरे आणि पालक मनोहर शिंपी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान विषय शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक व शैक्षणिक सुविधांबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित असलेल्या सर्व दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य आणि भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशेष शिक्षक हिरालाल चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन विशेष शिक्षक निलेश मराठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष शिक्षक भरत मराठे, जगदीश मराठे, प्रविण पाटील, विरेंद्र गिरासे, रंजना चौधरी, गौतम सामुद्रे व हेमंत पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

**समावेशीत शिक्षण उपक्रम: समता सप्ताह (३ ते ९ डिसेंबर २०२५)**

समावेशीत शिक्षण उपक्रमांतर्गत गटसाधन केंद्र शिक्षण विभाग, पंचायत समिती, तळोदा यांच्या मार्फत दि. ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'समता सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे.

या सप्ताहानिमित्त तळोदा तालुक्यातील विविध शाळांमध्ये दिव्यांगां बाबत जनजागृती अभियान, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थी/बालक/पालक व त्यांना शिकविणारे शिक्षक यांच्यासाठी परिसंवाद, चर्चासत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तळोदा गटसाधन केंद्रातर्फे सर्व संबंधितांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची दीपक देशमुख यांनी घेतली भेट

## फोन रेकॉर्डिंगची गंभीर दखल घेऊन सौ.संध्या दीपक देशमुख व दीपक देशमुख यांना तत्काळ संरक्षणाची मागणी

### परळी शहरात मतदान २० डिसेंबर रोजी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व त्यांचे पती माजी नगरसेवक दीपक रंगनाथ देशमुख यांच्या जीवितास व सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, त्यांना तत्काळ पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कवत यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यापूर्वी खासदार बजरंग सोनवणे यांनी दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांना लेखी पत्र देऊन सौ. संध्या देशमुख व दीपक देशमुख यांना संरक्षण देण्याची मागणी केली होती. मात्र परळी पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी दखल घेत नसल्याने, व अद्याप संरक्षण न मिळाल्याने ही भेट घेण्यात आली.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या परळी शहरात निवडणूक काळात होत व आहे असलेल्या कथित गैरप्रकारांमुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, कोणत्याही क्षणी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. येत्या २० डिसेंबर रोजी परळी शहरात पाच नगरसेवक पदासाठी मतदान प्रक्रिया होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचे पती बाजीराव धर्माधिकारी यांची कथित फोन रेकॉर्डिंग व्हायरल झाली आहे. या संभाषणात दीपक देशमुख यांचे नाव येत असल्याने ते 'रडारवर' आल्याचे स्पष्ट होत असून, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या सर्व बाबी लक्षात घेता, संभाव्य धोका टाळण्यासाठी सौ. संध्या दीपक देशमुख व दीपक रंगनाथ देशमुख यांना तत्काळ पोलीस संरक्षण द्यावे, परळी शहर पोलीस स्टेशचे अधिकारी व कर्मचारी संबंधित प्रकरणात दखल घेत नाही. दोन वेळा या प्रकरणी ते पोलीस स्टेशनला जाऊन आले. तसेच संबंधित कथित फोन रेकॉर्डिंगची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



# साने गुरुजी निवासी विद्यालयात तालुकास्तरीय मूल्यवर्धन ४.० प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा सुरू

## प्राचार्य डॉ. कविता कराड यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील साने गुरुजी निवासी विद्यालय येथे सोमवारी तालुका स्तरीय मूल्यवर्धन ४.० प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटन प्रा.डॉ. कविता कराड यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण शिंदे सर हे होते.उद्घाटन सत्रात मदने सर,चंद्रकांत मुंडे, संध्याराणी कोल्हे मॅडम, विक्रम डोईफोडे यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.प्रा.डॉ. कविता कराड यांनी मूल्यवर्धन ४.० उपक्रमाचे उद्दिष्ट,विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणाऱ्या कौशल्यांचे महत्त्व तसेच अध्यापनातील नाविन्य पूर्ण पद्धती याबाबत मार्गदर्शन केले.




प्रशिक्षणातून शिक्षकांना नवनवीन अध्यापनतंत्रांचा वापर,विद्यार्थी केंद्रीत पद्धतींचा अवलंब आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढी साठी आवश्यक असलेली साधने प्राप्त होणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे शिक्षक साखरे सर यांनी शाळेच्या वतीने केले. तालुकास्तरीयशिक्षकांच्या उपस्थितीत तिसरा टप्पा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.तदनंतर ४.० चा उद्घाटन समारंभ संपन्न झाला आहे.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत ग्रा.पं. पळसखेडा येथे निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी पळसखेडा ग्राम पंचायत कार्यालय येथे भारतसरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून ग्रामस्थांना एक दिवसीय स्मार्टनिवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन सरपंच श्री.वसंत चव्हाण व उपसरपंच श्री.अनुरथ चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्सचे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित उपस्थितांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी महिलांना बचत,आर्थिक नियोजन व त्याचे महत्त्व,डिमॅट अकाउंट,फायनान्शियल



मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज (सोने,चांदी) यांची मागणी व येणाऱ्या काळात त्यात होणाऱ्या भाव वाढीचे बदल,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशनक्ट,कमोडिटी व इक्विटीमध्ये असलेला फरक,तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना महिलांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी लहू मुळे यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन केले.तसेच या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी येथील प्राथमिक निवासी आश्रम शाळेत महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

प्राथमिक निवासी आश्रम शाळा,टाकळी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महा परिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.शाळेच्या आवारात डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व उपस्थित मान्यवरांनी आदरांजली वाहिली.या प्रसंगी शाळेचे संस्थाचालक श्रीकांत घुले तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी डॉ.आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना संविधान, समता,शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून सामाजिक संदेश दिला. कार्यक्रमात शिक्षक, शिक्षिका,आश्रमशाळेतील मुले-मुली तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. महापुरुषांप्रती कृतज्ञता व्यक्त करत कार्यक्रम संपन्न झाला.

# उदगीर येथे सहकारी पतसंस्था संचालक कर्मचारी यांचा सहकार प्रशिक्षण वर्ग संपन्न

## लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांच्या कर्तृत्वाला उदगीर करांची कौतुकाची थाप

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर येथे नागरी,ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे संचालक,कर्मचारी यांच्याकरिता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.या प्रशिक्षण वर्गात सहकार परीक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस.आर. कोळे,कर सल्लागार तथा प्रमाणित लेखा परीक्षक श्री.रवींद्र सुरशेटे,बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध सहकार तज्ञ,व्याख्याते श्री.खोडसे सी.ए प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उदगीर कार्यालयाचे जे.एस.चोले मुख्य लिपिक,एम.बी. सुवर्णकार यांनी



उपस्थित राहून सहकार कायदा, कर सल्लागार,आदर्श पोटनियम दुरुस्ती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच सहकार तज्ञ व्याख्याते श्री.खोडसे सी.ए प्रमाणित लेखा परीक्षक यांनी ठेवी सुरक्षिता,कर्ज वितरण करत असताना घ्यावयाची दक्षता,१०१ ची प्रकरणे कायदेशीर कारवाई,कर्ज वसुली, एनपीए,नियामक मंडळ पतसंस्था यांनी निर्गमित केलेल्या एम आय एस ची ऑनलाईन माहिती भरणे, या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवर चोले साहेब,श्री.रविंद्र सुर शेट्टी,खडसे साहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन वर्ग संयोजक श्री. एस.आर.कोळे यांनी केले.किसान शिक्षण प्रसारक मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्थेने कार्यक्रम आयोजित करण्यात सहकार्य केले. दरम्यान उदगीरकरांनी प्रमाणित लेखा परीक्षक श्री.सी.ए.खोडसे यांच्या मार्गदर्शनाची व कर्तृत्वाची प्रशंसा करत कौतुकाची थाप दिली.हीचकौतुकाची थाप व प्रशंसा माझ्या पुढील यशस्वी आयुष्या साठी निश्चितच ऊर्जादायी व प्रेरणादायी राहील अशी प्रतिक्रिया प्रमाणित लेखा परीक्षक श्री.सी.ए.खोडसे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

# विद्यार्थ्यांनी जीवनात परिश्रम, शिस्त व नैतिक मुल्यांची जपणूक करावी–प्राचार्य विलास पाटील

## नवोदय विद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात प्राचार्य पाटील यांनी केले प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात परिश्रमा सोबत शिस्त आणि नैतिक मूल्यांना महत्व दिले तर आयुष्य सुखकर, व वैभवशाली होऊन यशाचे परमोच्च शिखर गाठल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीवन जगत असतांना नैतिक मुल्यांना महत्व द्यावे असे प्रतिपादन प्राचार्य विलास पाटील यांनी केले.

अक्कलकुवा येथे जवाहर नवोदय विद्यालयात 'माजी विद्यार्थ्यांचा मेळावा' अत्यंत उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन नवोदय विद्यालयाचे प्राचार्य विलास पाटील बोलत होते. मेळाव्याचे प्रास्ताविक विद्यालयाचे मराठी विषयाचे शिक्षक संजय पाचोरे यांनी केले.



त्यांनी मेळाव्याच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. ज्ञानेश्वर पाटील, डॉ. महेंद्र बोरसे, अनिल नाईक, प्रशांत जाधव, ज्ञानेश्वर कोळी, विकास पाटील, वसंत तडवी, सुदाम वळवी आदींनी मनोगत व्यक्त करत आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तप्रिय जीवनशैली आणि ध्येयपूर्तीसाठी चिकाटीने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. तर संगीत शिक्षक अविनाश तळणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केली. विद्यालयाची विद्यार्थिनी प्रारब्धा पाटील हिने सादर केलेली देखणी लावणी उपस्थितांची विशेष दाद मिळवून गेली व कार्यक्रमात सांस्कृतिक रंग भरले. मेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रामेश्वर वाढेकर यांनी केले. माजी विद्यार्थी, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये झालेला स्नेहसंवाद स्नेह भोजन यामुळे संपूर्ण वातावरण प्रेरणादायी व भावपूर्ण बनले. यावेळी व्हॉलीबॉलचा मैत्री पुर्ण सामना झाला. या वेळी मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी, नवोदय विद्यालयाचे शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी या मेळाव्याचे भरभरून कौतुक करत तो शाळेच्या गौरवशाली परंपरेचा अविभाज्य भाग ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

# जवाहर नवोदय विद्यालयाची निवड परीक्षा १३ डिसेंबर रोजी पाच केंद्रांवर होणार

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी**

अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालयाची २०२५/ २६ निवड परीक्षा दि.१३ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी जिल्ह्यातील एकूण ५ केंद्रांवर आयोजित करण्यात आली असल्याची माहिती अक्कलकुवा नवोदय विद्यालयाचे प्राचार्य विलास पाटील यांनी दिली. सन २०२५/ २६ साठी दि. १३ डिसेंबर रोजी नवोदय विद्यालयाची प्रवेश चाचणी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा अक्कलकुवा, तळोदा, धडगाव शहादा येथे तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. शहादा येथे दोन परीक्षा केंद्रे असून इतर तालुक्यांत प्रत्येकी एक परीक्षा केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. ही परीक्षा सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. परिक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेशपत्र एक दिवस आधीच डाऊनलोड करुन विद्यार्थ्यांकडे द्यावे. केंद्रावरील आसन क्रमांक शोधणे सोपे जाईल आणि विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वातावरणाशी परिचित होता येईल यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर किमान एक तास आधी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य विलास पाटील यांनी केले आहे. जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि नवोदय विद्यालय प्रशासन यांनी एकमेकां सोबत समन्वय साधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत, वाहतूक, पर्यवेक्षण, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता आदी सर्व बाबींवर काटेकोर पद्धतीने नियोजन केले आहे. तसेच परीक्षे दरम्यान विद्यार्थ्यांना पारदर्शक व गोंगाट मुक्त वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, वैद्यकीय सुविधा, व्हिडिओ मॉनिटरिंग, केंद्र प्रमुखांची नियुक्ती, निरीक्षकांचे प्रशिक्षण आदी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत अशी माहिती ही प्राचार्य विलास पाटील यांनी दिली.जवाहर नवोदय विद्यालयाची निवड चाचणी परीक्षेची सर्व तयारी पुर्ण झाली असुन परीक्षा सुरळीत व यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शिक्षणाधिकारी राहुल अहिरे हे सतत परीक्षेवर देखरेख करीत असुन जिल्हा प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांच्या समन्वयाने परीक्षा पार पडणार असून, जिल्ह्यातील सर्व पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य करुन परीक्षा यशस्वी करण्यासाठी प्रशासनास मदत करावी असे आवाहनही प्राचार्य विलास पाटील यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077